# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

## गृहपाठ

## बी. ए. अर्थशास्त्र

द्वितीय वर्ष (सत्र ३ व सत्र ४)

२०१६–१७

प्रती :

# गृहपाठ लिहिण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी पुढील सूचना वाचाव्यात व त्याप्रमाणे गृहपाठांचे काम करावे.

१. बी. ए. (विशारद) सामाजिकशास्त्रे या अभ्यासक्रमातील गृहपाठ लेखन हा महत्त्वाचा आणि अनिवार्य भाग आहे. गृहपाठ लिहिण्यापूर्वी विद्यार्थ्याने संबंधित विषयाचे पुस्तक वाचून मगच गृहपाठ लिहिणे आवश्यक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा विषयाचा अभ्यास होतो. स्वयंअध्ययनाची सवय व्हावी व उत्तरपत्रिका लेखनाचा सराव व्हावा हाच गृहपाठ लेखनामागील हेतू आहे.

२. गृहपाठ लिहिताना पुस्तकातील मजकुराची केवळ नक्कल करू नये. विद्यार्थ्याने विषय समजून घेऊन गृहपाठ लिहिला आहे की नाही हे जाणीवपूर्वक पाहिले जाते आणि त्याप्रमाणे गुण दिले जातात.

३. गृहपाठ त्यांच्या अनुक्रमानुसार व सलग लिहावेत. एक गृहपाठ संपल्यावर ठळक रेघ मारून पुढील ओळीवर अथवा नव्या पानावर पुढील गृहपाठ लिहावा. उत्तरात लाल शाईचा वापर करू नये. योग्य समास सोडावा.

४. मोठ्या प्रश्नांचे उत्तर ४० ते ५० ओळीत असावे. गरजेनुसार जास्त चालेल. टीपा लिहा प्रत्येकी २०–२५ ओळीत उत्तरे असावे.

५. उत्तरात गरज नसताना १, २, ३....... असे आकडे घालण्याऐवजी योग्य परिच्छेद पाडावेत.

६. उत्तराला सुरुवात करताना प्रास्ताविक व उत्तराच्या शेवटी समारोप असेल तर ते उत्तर अधिक चांगले मानले जाते.

**७. सत्र ३ व सत्र ४ चे गृहपाठ एकत्रित दिलेले आहेत याची नोंद घ्यावी.**

८. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार 'क्षेत्रीय कार्य' अथवा उपक्रम हा प्रश्न घालण्यात आला आहे. त्यासाठी अवांतर वाचन व सद्यःस्थितीतील घडामोडींचे निरीक्षण आवश्यक आहे.

## गृहपाठ सादर करण्याची मुदत

| **सत्र** | **विना विलंबशुल्क** | **विलंब शुल्कासह** |
|---|---|---|
| तिसरे | ३१ ऑक्टोबर २०१६ | १५ नोव्हेंबर २०१६ |
| चौथे | १५ मार्च २०१७ | ३१ मार्च २०१७ |

# बँकिंग – भाग – १

## सत्र ३ : प्रकरण १ ते ९

---

**प्र. १. घटक बँक पद्धती म्हणजे काय? घटक बँक पद्धतीचे फायदे सांगा.**

**उत्तर – प्रस्तावना –** घटक बँक पद्धतीबाबत स्पष्टीकरण.

फायदे – स्पष्ट करताना पुढील मुद्द्यांचे विश्लेषण आवश्यक – प्रभावी नियंत्रण, कार्यक्षम व्यवस्थापन, लहान प्रमाणावरील व्यवहाराचे फायदे, ग्राहक संपर्क, व्यवस्थापन खर्चात बचत, कर्ज वसुलीचे मोठे प्रमाण, स्थानिक आर्थिक विकास, भ्रष्टाचाराचे प्रमाण कमी, बँका बुडण्याची शक्यता कमी, आर्थिक विकास, भ्रष्टाचाराचे प्रमाण कमी, आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण, मक्तेदारी नसते, लवचिक कार्यपद्धती इ.

**समारोप –** सारांश रूपाने.

**प्र. २. व्यापारी बँकांची कार्ये स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** व्यापारी बँका अनेक प्रकारची प्राथमिक, दुय्यम व सामाजिक कार्ये करीत असतात. याबाबतचे विश्लेषण.

कार्ये – १) प्राथमिक कार्ये – विविध प्रकारच्या ठेवी स्वीकारणे, कर्ज देणे, पतपैशाची निर्मिती

२) दुय्यम कार्ये – विविध स्वरूपाची प्रातिनिधिक कार्ये, विविध उपयुक्ततेची कार्ये.

३) सामाजिक कार्ये – देशात आर्थिक व सामाजिक परिवर्तन घडवून आणणे.

इ. मुद्द्यांचे स्पष्टीकरण.

सारांश रूपाने समारोप लिहावा.

**प्र. ३. थोडक्यात उत्तरे द्या.**

**अ) शाखा बँक पद्धतीचे दोष/तोटे सांगा.**

**उत्तर – प्रस्तावना –** शाखा बँक पद्धतीबाबत स्पष्टीकरण. शाखा बँक पद्धतीचे अनेक फायदे असले तरी अनेक दोष/तोटेही आढळून येतात. दोष – व्यवस्थापकीय अकार्यक्षमता, निर्णयातील विलंब, कर्जाबाबतच्या अडचणी, सहकाऱ्यांशी सुसंवाद नसतो. ठेवींचा वापर इतरत्र, काही शाखा अकार्यक्षम, कर्मचाऱ्यांची मानसिकता, वाढीव खर्च, बँका बुडण्याची भीती, अनिष्ट स्पर्धा, अलवचिक नियम, भ्रष्टाचार, केंद्रीकरण–मक्तेदारी, कामगारविषयक प्रश्न इ.

सारांश रूपाने समारोप.

**ब) सहकारी बँकांची वैशिष्ट्ये सांगा.**

**उत्तर – प्रस्तावना –** सहकारी बँकेची व्याख्या व स्पष्टीकरण.

पुढील वैशिष्ट्ये थोडक्यात स्पष्ट करणे आवश्यक. वैशिष्ट्ये– सहकारी तत्त्वानुसार स्थापना, लोकशाही व्यवस्थापन, विविध उद्दिष्टांसाठी स्थापना, भाग खरेदी करून सभासदत्व, व्यापारी बँकेच्या सर्व सेवांचा पुरवठा, बिगर सभासदांनाही सेवा, कार्यक्षेत्र– उद्दिष्टानुसार विविध प्रकार.

सारांश रूपाने समारोप.

**प्र. ४. टिपा लिहा.**

**अ) बँक ताळेबंदाचे महत्त्व.**

**उत्तर – प्रस्तावना –** ताळेबंदाची व्याख्या व स्पष्टीकरण.

महत्त्व – बँक व्यवसायाची प्रगती समजते, बँकेवर नियंत्रण ठेवण्यासाठी, बँकिंग क्षेत्राविषयीचे धोरण ठरविण्यासाठी उपयोग, भागधारक–ठेवीदारांच्या दृष्टीने उपयुक्त, आर्थिक स्थैर्य–रोखता–लाभप्रदता–गुंतवणूक याची कल्पना येते. इ. मुद्द्यांचे विश्लेषण.

समारोप – सारांश रूपाने.

**ब) धनादेशाची वैशिष्ट्ये.**

**उत्तर – प्रस्तावना –** धनादेशाची व्याख्या व स्पष्टीकरण.

वैशिष्ट्ये – चलनक्षम पत्रक, प्रत्येक धनादेश हुंडी; मात्र सर्व हुंड्या धनादेश नसतात, विशिष्ट व्यक्तीलाच पैसे देण्याचा आदेश, विना अट; बिनशर्त असतो. तारीख आवश्यक असते, रक्कम निश्चित असते – आकडा व अक्षरात लिहावी लागते, मागणी केल्यावरच रक्कम मिळते, धनादेश वाहक– रेखांकित असू शकतो, भविष्यात वटणाऱ्या धनादेशाची रक्कम बँक देत नाही, दिलेल्या तारखेपासून तीन महिन्यांच्या मुदतीपर्यंत वैध, खात्यात पैसे शिल्लक असणे आवश्यक असते, चेक काढण्यापूर्वी बँकेच्या पूर्व परवानगीची गरज नसते. इ.

सारांश रूपाने समारोप.

**प्र. ५. अलीकडील काळात राष्ट्रीयीकृत बँका ग्राहकांना देत असलेल्या आधुनिक सुविधांचा सविस्तर अहवाल लिहा.**

---------------------------------------------------------

## बँकिंग – भाग – २

### सत्र ४ : प्रकरण १० ते १८

---

**प्र. १. भारतीय नाणे बाजाराचे दोष स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** नाणे बाजाराची व्याख्या व स्पष्टीकरण.

भारतीय नाणेबाजाराची अनेक वैशिष्ट्ये. त्यामधून भारतीय नाणेबाजारात अनेक दोष दिसून येतात.

वैशिष्ट्ये/दोष – असंघटित बाजार – बँक व्यवसायाचा प्रसार कमी – पतपत्रांची टंचाई – खासगी क्षेत्राचे वर्चस्व – हंगामी चढ–उतार – विशिष्ट कार्यासाठी कर्ज पुरविणाऱ्या संस्थांचा अभाव – अविकसित उपबाजार – कर्जपुरवठ्यातील ताठरता – एकात्मतेचा अभाव – साठवणूक सोयींचा अभाव – बेहिशेबी पैशाचे मोठे प्रमाण – अलवचिक कार्यपद्धती – तज्ज्ञ सेवांचा अभाव इ. मुद्द्यांचे विश्लेषण आवश्यक.

सारांश रूपाने समारोप.

**प्र. २. पतनिर्मितीवरील मर्यादा स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** पतनिर्मितीची संकल्पना – थोडक्यात स्पष्टीकरण. अमर्याद पतनिर्मिती देशासाठी हितकारक नसते.

मर्यादा – अर्थव्यवस्थेतील एकूण चलन संख्या – प्राथमिक ठेवींची संख्या – कर्जाची मागणी – लोकांचे रोखता प्राधान्य – लोकांच्या बँक सवयी – योग्य तारण व कारण – रोखतेचे एकूण ठेवींशी प्रमाण – रिझर्व बँकेचे चलन विषयक धोरण – निरसन गृहाच्या सोयी – बँकेतर संस्थांचे ठेवी स्वीकारण्याचे प्रमाण – देशातील आर्थिक परिस्थिती – बँकांचे वैयक्तिक धोरण इ. मुद्द्यांचे विश्लेषण आवश्यक.

समारोप – सारांश रूपाने.

**प्र. ३. थोडक्यात उत्तरे द्या.**

**अ) भांडवल बाजारातील घटक स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** भांडवल बाजारातील घटकांचा अभ्यास करताना १) भांडवलाचा पुरवठा करणाऱ्या संस्था. २) भांडवलाची मागणी करणाऱ्या संस्था. ३) भांडवल बाजाराचे उपबाजार यांचा समावेश होतो.

१) भांडवल पुरवठा करणाऱ्या संस्था – व्यक्ती, बँका, विमा कंपन्या, गुंतवणूक विकास बँका इ.

२) भांडवल मागणी करणाऱ्या संस्था – खासगी उद्योग, सरकार, सार्वजनिक उद्योग, महामंडळे इ.

३) भांडवल बाजाराचे उपबाजार – शेअर बाजार, कर्जरोख्यांचा बाजार, सरकारी कर्जरोखे बाजार, मुदती कर्जबाजार, ठेवी बाजार, धातू बाजार इ. मुद्द्यांचे थोडक्यात स्पष्टीकरण.

समारोप – सारांश रूपाने.

**ब) पतनियंत्रणाची संख्यात्मक साधने सांगा.**

**उत्तर – प्रस्तावना –** पतनिर्मिती व पतनियंत्रण याबाबतचे थोडक्यात स्पष्टीकरण. पतनियंत्रणासाठी काही संख्यात्मक व गुणात्मक साधने वापरली जातात. पैकी संख्यात्मक साधने – बँक दर, खुल्या बाजारातील रोख्यांची खरेदी–विक्री, रोख निधीच्या प्रमाणात बदल इ. मुद्द्यांचे स्पष्टीकरण.

सारांश रूपाने समारोप.

**प्र. ४. टिपा लिहा.**

**अ) पतनियंत्रणाची गुणात्मक साधने.**

**उत्तर – प्रस्तावना –** पतनिर्मिती व पतनियंत्रण याबाबतचे थोडक्यात स्पष्टीकरण. पतनियंत्रणासाठी काही संख्यात्मक व गुणात्मक साधने वापरली जातात. त्यापैकी गुणात्मक साधने – कर्ज व तारण यामधील गाळा ठरविणे, उपभोग कर्जाचे नियंत्रण, कर्जाचे वाटप, नैतिक समज, प्रत्यक्ष कारवाई, प्रसिद्धी, आदेश इ. मुद्द्यांचे थोडक्यात विश्लेषण. सारांश रूपाने समारोप.

**ब) विकास बँकांची उद्दिष्टे**

**उत्तर – प्रस्तावना –** विकास बँकेची व्याख्या व स्पष्टीकरण. कोणत्याही देशात विकास बँकांची नितांत आवश्यकता असते. अर्थव्यवस्थेच्या गरजेनुसार साधारणपणे पुढील उद्दिष्टांसाठी या बँका कार्य करतात. उद्दिष्टे– देशाचा जलद आर्थिक विकास, उद्योग–शेतीला पतपुरवठा, कर्जाची हमी घेऊन मदत, प्रवर्तन घडवून आणणे, दुय्यम सेवांची उपलब्धता करणे, संयोजन कौशल्याचा विकास घडवून आणणे, मागास भागाचा विकास, रोजगार निर्मिती, दारिद्र्य निर्मूलन, मागास क्षेत्रात गुंतवणूक, नवीन उद्योगांना मदत इ. मुद्द्यांचे स्पष्टीकरण.

सारांश रूपाने समारोप.

**प्र. ५. सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी योजनेबाबत सविस्तर अहवाल लिहा.**

# समग्रलक्षी अर्थशास्त्र – भाग – १

## सत्र ३ : प्रकरण १ ते ७

**प्र. १. राष्ट्रीय उत्पन्नाची व्याख्या सांगून, राष्ट्रीय उत्पन्न मोजण्याच्या पद्धती स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** राष्ट्रीय उत्पन्नाच्या अनेक व्याख्या. त्यापैकी राष्ट्रीय उत्पन्न समितीने केलेली व्याख्या व त्याचे स्पष्टीकरण. राष्ट्रीय उत्पन्न मोजण्याच्या तीन प्रमुख पद्धती १) उत्पादन २) उत्पन्न व ३) खर्च पद्धती. या तीन प्रमुख पद्धतीचे उदाहरणासह सविस्तर स्पष्टीकरण आवश्यक.

**प्र. २. वस्तू विनिमयाचा अर्थ सांगून, प्रत्यक्ष वस्तू विनिमयातील अडचणी उदाहरणासह स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** एक वस्तू देऊन दुसरी मिळवणे म्हणजे वस्तू विनिमय होय. औद्योगिक क्रांतीपूर्वीच्या समाजातील वस्तू विनिमय याबाबतचे स्पष्टीकरण. मात्र प्रत्यक्ष वस्तू विनिमय करताना पुढील अडचणी. १) वस्तूंच्या परस्पर विनिमयाचे प्रमाण ठरविणे. २) गरजांच्या दुहेरी संयोगाची आवश्यकता ३) विलंबित देणी भागविण्याची अडचण ४) मूल्य संग्रहाची अडचण. या सर्व अडचणींचे उदाहरणासह स्पष्टीकरण आवश्यक.

**प्र. ३. थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)**

**अ) उत्पन्नाचा वर्तुळाकार प्रवाह ही संकल्पना आकृतीसह स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** अर्थव्यवस्थेतील कुटुंबसंस्था व उद्योग संस्था हे उत्पादनाच्या कार्यात सहभागी होतात. तसेच विविध वस्तू व सेवांचा उपभोगही घेत असतात. या दोन्ही संस्थांच्या परस्परावलंबित्वामधून अर्थव्यवस्थेत उत्पन्नाचा, निर्माण होणाऱ्या संपत्तीचा वर्तुळाकार प्रवाह निर्माण होतो. एकाचा खर्च हा दुसऱ्याचे उत्पन्न असते व ते वर्तुळाकार सातत्याने फिरत राहते. याबाबतचे आकृतीसह विश्लेषण आवश्यक.

**ब) जे. बी. से यांचा बाजारपेठेविषयक सिद्धांत स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** सनातनवादी मीमांसा, अर्थव्यवस्था पूर्ण रोजगार पातळीवर समतोलावस्थेत असते असे मानते. यालाच आधारभूत असा से चा बाजारपेठ विषयक सिद्धांत आहे.

से च्या सिद्धांताप्रमाणे 'प्रत्येक पुरवठा आपली मागणी निर्माण करतो.' म्हणजेच प्रत्येक उत्पादन आपल्यासाठी बाजारपेठ निर्माण करते. याचा अर्थ से चा सिद्धांत अर्थव्यवस्थेत अतिरिक्त पुरवठा किंवा एकूण मागणीची कमतरता असण्याची शक्यता नाकारतो. याबाबतचे उदाहरणासह स्पष्टीकरण आवश्यक.

**क) प्रभावी किंवा परिणामकारक मागणी म्हणजे काय?**

**उत्तर – प्रस्तावना –** केन्सच्या मते प्रभावी मागणी ही समग्र मागणी व समग्र पुरवठा यांच्या परस्पर क्रियेने ठरते म्हणून समग्र मागणी फल व समग्र पुरवठा फलाचा विचार करावा लागतो.

समग्र मागणी फल व समग्र पुरवठा फल याबाबतचे आकृतीसह स्पष्टीकरण आवश्यक.

**ड) अर्थव्यवस्थेतील बचतीचे प्रमाण कोणत्या घटकांवर अवलंबून असते?**

**उत्तर – प्रस्तावना –** केन्स यांच्या बचत विषयक संकल्पनेचे स्पष्टीकरण. अर्थव्यवस्थेतील बचतीचे प्रमाण अनेक घटकांवर अवलंबून असते. पुढील घटकांचे स्पष्टीकरण आवश्यक. १) उत्पन्न २) उत्पन्नाचे वाटप

३) व्याजदर ४) भविष्यकाळा संबंधीची अपेक्षा /अंदाज ५) राज्यवित्तीय धोरण ६) वित्तीय संस्थांचा विकास ७) सवयी ८) राजकीय स्थैर्य इ.

**प्र. ४. टिपा लिहा. (कोणत्याही दोन)**

**अ) राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीचे महत्त्व.**

**उत्तर – प्रस्तावना –** विविध क्षेत्रांबाबत आर्थिक निर्णय घेण्यापूर्वी राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीचा विचार करावा लागतो. राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीची उपयुक्तता स्पष्ट करताना पुढील मुद्द्यांचे स्पष्टीकरण आवश्यक. अर्थव्यवस्थेची प्रगती अभ्यासणे, जागतिक पातळीवर देशाचे स्थान, आर्थिक नियोजनासाठी उपयुक्त, तेजी–मंदीची परिस्थिती समजते, राष्ट्रीय उत्पन्नाचे विभाजन, लोकांची क्रयशक्ती समजते, सामाजिक कल्याण मोजता येते, मागणीतील बदलाचा अभ्यास करता येतो. सरकारच्या विविध धोरणासाठी उपयुक्त इ.

**ब) उपभोग प्रवृत्तीवर परिणाम करणारे घटक.**

**उत्तर – प्रस्तावना –** उपभोग प्रवृत्ती ठरविणारा सर्वांत महत्त्वाचा घटक वास्तव उत्पन्न हा असला तरीही काही व्यक्तिनिष्ठ व वस्तुनिष्ठ घटकही परिणाम घडवून आणतात.

पुढील घटकांचे स्पष्टीकरण आवश्यक. उत्पन्नाचे पुनर्वाटप, वेतनविषयक धोरण, सहज व स्वस्त दराने कर्जाची सोय, शहरीकरणातील वाढ, जाहिरातबाजी, वाहतूक साधने – सोयींचा विकास, सामाजिक सुरक्षा योजना इ.

**क) तुटीच्या अर्थभरण्याचे तोटे.**

**उत्तर – प्रस्तावना –** जादा चलन छापून तूट भरून काढणे म्हणजे तुटीचा अर्थभरणा. या संकल्पनेचे थोडक्यात स्पष्टीकरण.

तुटीच्या अर्थभरण्याचे काही फायदे होत असले तरी अनेक तोटेही होत असतात. तोटे स्पष्ट करण्यासाठी पुढील मुद्द्यांचे विश्लेषण आवश्यक – भाववाढीचा धोका, उपभोगात सक्तीची घट, साठेबाजी – सट्टेबाजीत वाढ, अनावश्यक गुंतवणूक, पतनिर्मितीत अवास्तव वाढ, सरकारकडून अनावश्यक खर्च इ.

**ड) पैशातील आवश्यक गुणधर्म**

**उत्तर – प्रस्तावना –** पैशाची व्याख्या व स्पष्टीकरण. पैसा जी कार्ये पार पाडतो, ती सुलभतेने होण्यासाठी पैशामध्ये काही गुणधर्म असणे आवश्यक असतात. गुणधर्म स्पष्टीकरणासाठी पुढील मुद्दे स्पष्ट करणे आवश्यक. सर्वमान्यता, टिकाऊपणा, वाहतुकीत सुलभता, विभाज्यता, एकजिनसीपणा, विशेषता, मूल्याची स्थिरता इ.

**प्र. ५ वा. आपल्या दैनंदिन व्यवहारात आपण अनेक प्रकारचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर भरीत असतो.**

**अशा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर भरण्याची प्रत्येकी तीन उदाहरणे सांगून तो कर कसा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष आहे ते स्पष्ट करा.**

# समग्रलक्षी अर्थशास्त्र – भाग – २

## सत्र ४ : प्रकरण ८ ते १४

**प्र. १. पैशाचा भ्रमण वेग म्हणजे काय? तो कोणत्या घटकांवर अवलंबून असतो.**

**उत्तर – प्रस्तावना –** पैशाच्या भ्रमणवेगाच्या संकल्पनेचे उदाहरणासह स्पष्टीकरण, पैशाचा भ्रमण वेग पुढील घटकांवर अवलंबून असतो. रोखतेची अभिलाषा, आर्थिक उलाढाल, उत्पन्नातील अनियमितता, उत्पन्नाचे विभाजन, आर्थिक व्यवहाराच्या पद्धती, पैशाच्या वहनाची गती, उत्पादनसंस्था आणि महामंडळांजवळील रोख रक्कम इ. मुद्द्यांचे सविस्तर विश्लेषण.

**प्र. २. आंतरराष्ट्रीय व्यापाराचे फायदे–तोटे स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** आंतरराष्ट्रीय व्यापाराची व्याख्या/संकल्पनेचे स्पष्टीकरण. आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे पुढील फायदे–तोटे होत असतात.

फायदे – सर्व वस्तू सर्व देशांना उपलब्ध, मूलभूत उद्योगासाठी लागणाऱ्या वस्तूंची उपलब्धता, वाढत्या मागणीची पूर्तता, अतीअवजड–महागड्या उत्पादनांची आयात, टंचाई–दुष्काळ अशा वेळी अन्नधान्याची आयात, नवे तंत्र, यंत्रे यांची आयात, आर्थिक विकासाचा वेग वाढविता येतो इ.

तोटे – जादा उत्पादनासाठी दुर्मिळ साधन–सामग्रीचा मोठा वापर, भविष्यकाळात टंचाई, उद्योगांचा असमतोल विकास, परावलंबित्व वाढत जाते, तेजी–मंदीचा इतर देशांवरही परिणाम, चैनीच्या वस्तूंवर अनावश्यक खर्च, बाजारपेठा काबीज करण्यासाठी गळेकापू स्पर्धा इ. मुद्द्यांचे स्पष्टीकरण.

**प्र. ३. थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)**

**अ) पतनिर्मितीवरील मर्यादा स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** पतनिर्मिती संकल्पनेचे स्पष्टीकरण. अमर्याद पतनिर्मिती अशक्य, पुढील मर्यादा – अर्थव्यवस्थेतील एकूण पैशाचा पुरवठा, रोख रकमेचे एकूण ठेवींशी प्रमाण, मध्यवर्ती बँकेचे धोरण, निरसन केंद्राची सोय, तारण क्षमता, कर्ज घेण्याची प्रवृत्ती व इच्छा, मध्यवर्ती बँकेचे चलनविषयक धोरण इ. मुद्द्यांचे स्पष्टीकरण.

**ब) पैशाच्या पुरवठ्यावर परिणाम करणारे घटक सांगा.**

**उत्तर – प्रस्तावना –** पैशाच्या पुरवठ्याची व्याख्या व स्पष्टीकरण. पैशाच्या पुरवठ्यावर अनेक घटकांचा परिणाम. घटक – मध्यवर्ती बँकेकडून केला जाणारा पुरवठा, लोकांच्या सवयी, लोकांना किती रोखता हवी आहे त्याचे प्रमाण, मध्यवर्ती बँकेचे चलन धोरण, सरकारचे राज्यवित्तीय व अंदाजपत्रकी धोरण, तेजी–मंदीची परिस्थिती, पैशाचा भ्रमणवेग इ. घटकांचे स्पष्टीकरण आवश्यक.

**क) अंतर्गत व आंतरराष्ट्रीय व्यापारातील साम्य व भेद स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** अंतर्गत व आंतरराष्ट्रीय व्यापार– संकल्पनांचे स्पष्टीकरण. दोन्हीमध्ये काही साम्य व काही फरक आढळतो. त्याचे विश्लेषण पुढीलप्रमाणे. साम्य – वस्तू व सेवांचा वापर व्यक्तींचाच सहभाग,

वैयक्तिक व प्रादेशिक विशेषीकरणाला अधिक वाव मिळतो. उत्पादन वाढीला चालना मिळते इ. फरक – परकीयांबरोबरचा व्यापार, भौगोलिक भिन्नता, चलनातील फरक इ.

**ड) सुवर्ण चलन परिमाणाची वैशिष्ट्ये सांगा.**

**उत्तर – प्रस्तावना –** सुवर्ण चलन परिमाण पद्धतीत प्रत्यक्ष सोन्याचीच नाणी असतात. त्याचे वजन व कस कायद्याने ठरवेला असतो. त्यामुळे चलनाची व सोन्याची किंमत समानच असते.

वैशिष्ट्ये – सोन्याचे व नाण्याचे मूल्य एकच असते, अमर्यादित विधीग्राह्य चलन, विधीसिद्ध चलनालाही सोन्याचे मूल्य असते, सोने आयात–निर्यात बंधने नसतात. मुक्त टांकसाळ पद्धती, सोन्याच्या साठ्यानुसार चलनाचा पुरवठा होतो, लोकांचा दृढ विश्वास, हुंडणावळ दर स्थिर असतो, चलननिर्मितीवर मर्यादा म्हणून चलनवाढीचा धोका कमी इ.

**प्र. ४. टीपा लिहा. (कोणत्याही दोन)**

**अ) रोखता व लाभप्रदता व सुरक्षितता**

व्यापारी बँकेची कार्यपद्धती प्रामुख्याने या तीन तत्त्वांवर अवलंबून असते. या तिन्ही तत्त्वांमध्ये समन्वय साधून बँका कसे कार्य करतात. या विषयीचे स्पष्टीकरण आवश्यक.

**ब) पतनियंत्रणाची उद्दिष्टे**

पतनिर्मिती व पतनियंत्रण याबाबत थोडक्यात विश्लेषण. पतनियंत्रणाच्या पुढील उद्दिष्टांचे स्पष्टीकरण आवश्यक. विनिमयातून स्थैर्य राखणे, देशांतर्गत किंमत पातळी स्थैर्य, पूर्ण रोजगाराकडे वाटचाल, आर्थिक वृद्धी इ.

**क) पतनियंत्रणाची संख्यात्मक साधने**

पतनियंत्रणाची संकल्पना स्पष्टीकरण. संख्यात्मक व गुणात्मक साधनांच्या साहाय्याने पतनियंत्रण केले जाते. त्यापैकी संख्यात्मक साधने – बँक दर, खुल्या बाजारातील रोख्यांच्या खरेदी–विक्रीचे व्यवहार, राखीव निधीचे गुणोत्तर या साधनांचे स्पष्टीकरण आवश्यक.

**ड) उचल अधिकार**

१९७० पासून आंतरराष्ट्रीय नाणे निधीने सुरू केलेली पद्धती. या पद्धतीची आवश्यकता व वैशिष्ट्ये सांगणे आवश्यक.

**प्र. ५. आपले ज्या बँकेमध्ये खाते आहे अशा बँकेच्या शाखाधिकाऱ्याला भेटून, बँक, रोखता–लाभप्रदता व सुरक्षितता या तिन्ही तत्त्वांचा समन्वय कसा साध्य करते याविषयी चर्चा करून २५–३० ओळींचा अहवाल लिहा.**

---

# विकासाचे अर्थशास्त्र – भाग – १

## सत्र ३ : प्रकरण १ ते ६

**प्र. १. आर्थिक विकासाची उद्दिष्टे, त्यांचे वर्गीकरण व आवश्यकता स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** आर्थिक विकास सतत चालू असणारी प्रक्रिया आहे. विकासाला पोषक वातावरण निर्माण करणे आवश्यक असते. अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रांत सुधारणा अपेक्षित असतात. त्या दृष्टीने पुढील उद्दिष्टे – १) दरडोई उत्पन्नात वाढ २) राष्ट्रीय उत्पन्नात वाढ– शेती, उद्योग, व्यापार, वाहतूक, दळणवळण यामध्ये वाढ. वर्गीकरण– आर्थिक विकासाच्या उद्दिष्टांचे वर्गीकरण– १) आर्थिक व आर्थिकेतर २) अल्पकालीन व दीर्घकालीन ३) मूलभूत व सहायक ४) प्राथमिक व दुय्यम अशा चार प्रकारांत केले जाते. याबाबतचे विश्लेषण.

शेवटी आर्थिक विकासाची आवश्यकता स्पष्ट करणे.

**प्र. २. विकासाचे आर्थिक घटक स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** आर्थिक विकासासाठी अनेक घटक उपयोगी असतात. त्यांची विभागणी प्रामुख्याने आर्थिक व आर्थिकेतर घटक अशी केली जाते.

त्यापैकी विकासाचे महत्त्वाचे आर्थिक घटक–उपलब्ध साधन–सामग्रीचा पर्याप्त वापर, विविध क्षेत्रांमध्ये साधनांची आदर्श विभागणी, उत्पादन सीमा वाढविणे, भांडवल, संयोजन कौशल्य, तंत्रज्ञान इ. घटकांचे उदाहरणासह स्पष्टीकरण आवश्यक.

सारांश रूपाने समारोप.

**प्र. ३. थोडक्यात उत्तरे लिहा.**

**अ) भांडवलाच्या मागणीवरील मर्यादा स्पष्ट करा**

**उत्तर – प्रस्तावना –** अल्पविकसित देशात गुंतवणुकीला महत्त्व. मात्र गुंतवणुकीसाठी भांडवलाची मागणी करताना अनेक मर्यादा येतात. मर्यादा – मर्यादित बाजारपेठा, बेकारीचे मोठे प्रमाण, मागास तंत्रज्ञान, संयोजकाचा अभाव, आवश्यक सुविधांचा अभाव, व्याजाचा दर, करविषयक धोरण, कायदेशीर तरतुदी इ. मुद्द्यांचे प्रत्येकी तीन–चार ओळीत स्पष्टीकरण आवश्यक.

सारांश रूपाने समारोप.

**ब) भांडवल संचयाचे अंतर्गत मार्ग स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** भांडवल संचय प्रक्रियेत बचत, तिचे एकत्रीकरण व उत्पादक कार्यात गुंतवणूक करणे हे टप्पे असतात.

बचत वाढविण्यासाठी काही अंतर्गत तर काही बाह्य मार्गांचा वापर केला जातो. त्यापैकी अंतर्गत मार्ग– राष्ट्रीय उत्पन्नात वाढ, बचतीला प्रोत्साहन, बँकांची स्थापना, सार्वजनिक कर्ज, सुप्त बेकारीचा वापर, उपलब्ध भांडवलाचा योग्य वापर, साठवलेला पैसा इ. मुद्द्यांचे विश्लेषण आवश्यक.

सारांश रूपाने समारोप.

**प्र. ४. टिपा लिहा.**

**अ) आर्थिक विकास आणि वृद्धी यातील फरक**

**उत्तर – प्रस्तावना –** दोन्ही शब्द तसे वरवर पाहता समान अर्थाचे वाटतात पण त्यामध्ये फरक. विविध अर्थतज्ज्ञांच्या मताच्या आधारे विकास आणि वृद्धी यातील फरकाचे उदाहरणासह विश्लेषण करणे आवश्यक.

सारांश रूपाने समारोप.

**ब) बचतीचे प्रमाण कमी असण्याची कारणे.**

**उत्तर – प्रस्तावना –** भारतासारख्या विकसनशील देशामध्ये बचतीचे प्रमाण फारच कमी असते– स्पष्टीकरण. बचत कमी असण्याची पुढील कारणे स्पष्ट करणे आवश्यक. कारणे – दारिद्र्य, बँकांचा अभाव, विकसित राष्ट्रांशी स्पर्धा, उत्पन्न वाढीचा मंद वेग, मागासलेपणा, दिखाऊ खर्च, विषमता, किंमत वाढ इ. मुद्द्यांचे उदाहरणासह थोडक्यात स्पष्टीकरण आवश्यक.

**प्र. ५. तुमच्या गावातील/शहरातील एखाद्या उद्योगाचा, तुमच्या परिसराच्या आर्थिक विकासासाठी कसा फायदा झाला. या विषयाचा ३०–४० ओळीत अहवाल लिहा.**

---

# विकासाचे अर्थशास्त्र – भाग – २

## सत्र ४ : प्रकरण ७ ते १२

---

**प्र. १. श्रमप्रधान उत्पादनतंत्राचे फायदे सांगा.**

**उत्तर – प्रस्तावना –** उत्पादन तंत्राचे दोन प्रकार– भांडवलप्रधान व श्रमप्रधान– थोडक्यात स्पष्टीकरण. विकसनशील देशात श्रमपुरवठा जास्त म्हणून श्रमप्रधान उत्पादन तंत्राचा वापर. त्याचे अनेक फायदे– रोजगार निर्मिती, सुप्त शक्तीचा वापर, भांडवलाची बचत व योग्य वापर, परकीय चलनाची बचत, कमी उत्पादन खर्च, उद्योगांचे विकेंद्रीकरण, किंमत वाढीवर नियंत्रण, उपभोग्य वस्तू उत्पादनास प्राधान्य, हंगामी बेकारीवर उपाय, उत्पन्नाचे अधिक समान वाटप, मर्यादित आयात. इ.

सारांश रूपाने समारोप.

**प्र. २. शासनाची आर्थिक विकासातील भूमिका स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** आर्थिक विकासात शासनाची महत्त्वाची भूमिका–विश्लेषण. भूमिका– पुढील मुद्द्यांच्या आधारे उदा.सह स्पष्टीकरण आवश्यक – सामाजिक व आर्थिक सुविधा, समाजाच्या सामाजिक व सांस्कृतिक प्रवृत्तीत बदल घडविणे – शिक्षण – सार्वजनिक आरोग्य व कुटुंब नियोजन – शेतीचा विकास – वेतन धोरण – वित्तीय धोरण – चलनविषयक धोरण – इतर सुधारणा इ.

सारांश रूपाने समारोप.

**प्र. ३. थोडक्यात उत्तरे लिहा.**

**अ) परकीय मदतीचे आर्थिक विकास प्रक्रियेतील महत्त्व स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** परकीय मदतीबाबत थोडक्यात स्पष्टीकरण. महत्त्व– उपलब्ध साधनांचा पर्याप्त वापर – तांत्रिक विकासाचे फायदे – विकासाची चौकट तयार करणे – राष्ट्रीय उत्पादनात वाढ – विदेशी भांडवल व अंतर्गत बचत – संयोजक वर्गाची निर्मिती – रोजगार वृद्धी – विदेशी भांडवल व व्यापारी तूट इ. मुद्द्यांचे विश्लेषण.

सारांश रूपाने समारोप.

**ब) रोस्टोव्हच्या सिद्धांतातील अतिउपभोगावस्था स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** रोस्टोव्ह सिद्धांताबाबत थोडक्यात स्पष्टीकरण. अतिउपभोगावस्था ही सिद्धांतामधील पाचवी व शेवटची अवस्था. या अवस्थेत दिसून येणाऱ्या पुढील गोष्टींचे थोडक्यात विश्लेषण. वास्तव उत्पन्न, शहरीकरण, सामाजिक कल्याण व सुरक्षा. यामुळे समाजाच्या आर्थिक कल्याणात अधिकच भर कशी पडते याबाबतचे स्पष्टीकरण

समारोप– रोस्टोव्ह यांनी या अवस्थेलाच सर्वसामान्यांच्या उच्च उपभोगाचे युग असे नाव दिलेले आहे.

**प्र. ४. टिपा लिहा.**

**अ) परकीय मदतीच्या मर्यादा**

**उत्तर – प्रस्तावना –** परकीय मदतीचे स्वरूप – स्पष्टीकरण. मात्र सतत परकीय मदत घेण्यावर काही मर्यादा पडतात. पुढील मुद्दे मर्यादा म्हणून स्पष्ट करणे आवश्यक – परावलंबित्व, अंतर्गत व्यवहारात हस्तक्षेप, आर्थिक शोषण, असंतुलित आर्थिक विकास, देशी उद्योगांशी स्पर्धा, आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण इ.

सारांश रूपाने समारोप.

**ब) छुपी बेकारी**

**उत्तर – प्रस्तावना –** अनेक विकसनशील, मागास देशात अतिरिक्त लोकसंख्या, कमी औद्योगिकीकरण, भांडवल टंचाई, साधनांची कमतरता यामुळे छुपी बेकारी आढळते. छुप्या बेकारीची संकल्पना – उदाहरणासह स्पष्टीकरण आवश्यक.

सारांश रूपाने समारोप.

**प्र. ५. तुमच्या परिसरातील एखाद्या लघुउद्योग प्रकल्पाला भेट देऊन तेथे श्रमप्रधान तंत्रज्ञानाचा वापर कितपत केला जातो व त्यामुळे त्या लघु उद्योगास होणारे फायदे अहवाल स्वरूपात लिहा.**

✻✻✻